www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर


मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 183 वा बुधवार दि. 19 मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## सार्वजनिक उत्सव समिती कळवा यांचे कडून शिवजयंती उत्सवाचे आयोजन.

दैनिक युवक आधार

शिवजयंती उत्सव,फाल्गुन शुक्ल तृतीया शके १९४६. हिंदू, वर्ष तिथी नुसार शिवजयंती आज सोमवार दिनांक १७/०३/२०२५ रोजी साजरी झाली . सार्वजनिक उत्सव समिती कळवा नाका येथील शास्त्री नगर कळवा येथून फटाक्यांच्या आतिषबाजी करण्यात आली तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कळवा विभाग शाखेच्या वतीने *छत्रपती शिवाजी महाराज* यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले,तसेच विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले होते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना*आणि सर्व पक्षातून मान्यवर आणि नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडी आणि जनता यांसकडून जोरदार प्रतिसाद मिळाला.





महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री कु. आदितीताई तटकरे यांना वाढदिवस अभिष्टचिंतन करताना राष्ट्रवादी युवक नेते श्री. मनोजशेठ टके, निष्णात वकील श्रीकांत रावकर, युवक कार्यकर्ते चेतन टके, ध्रुव सोष्टे, संदीप जोशी, भारत शिरसाट, नितीन शिंदे, केतन भोय व पदाधिकारी व कार्यकर्ते छायाचित्रात दिसत आहेत

( छायाचित्र दैनिक युवक आधार )

# पनवेल मध्ये उसळला बौद्ध बांधवांचा जनसागर

**दैनिक युवक आधार**
**विशाल सावंत**

बिहार येथील बुद्धगया हे भारतीयांचेच नव्हे तर संपूर्ण जगातील बौद्ध बांधवांचे आस्था आणि श्रद्धेचे स्थान आहे. जगभरातील बौद्ध आपल्या आयुष्यात एकदा बुद्धगयेच्या

**या महामोर्चाला 2000 हून अधिक महिला व पुरुष आणि युवक मोठे संख्येने उपस्थित होते**

महाबोधी विहाराला भेट देतात. महाबुद्ध विहार हे जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून जाहीर झाले आहे. मात्र या विहारावर बौद्धेतरांचे वर्चस्व असून सम्राट अशोकाने निर्माण केलेल्या महाबोधी महाविहाराचे स्वामित्व आणि व्यवस्थापन बिहार सरकारने काळा कायदा करून बळकावल्यामुळे भारतातील समस्त बौद्धांनी याचा निषेध केला आहे. महाबोधी टेम्पल अक्ट रद्द करावा या मागणीसाठी भिक्खू संघाने बुद्धगया येथे भव्य आंदोलन सुरू केले आहे. त्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच बौद्ध टेम्पल ऍक्ट रद्द करावा यासाठी पनवेल तालुक्यातील तमाम बौद्ध बांधवांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते प्रांत कार्यालय असा मोर्चा शेकडोंच्या संख्येने मोर्चा काढण्यात आला यावेळी प्रांत अधिकारी पवन चांडक यांना निवेदन देण्यात आले . बिहार मधील बुद्धगया येथे तथागत भगवान गौतम बुद्धांचे हजारो वर्षापासून विहार असताना देखील त्याचा ताबा मात्र बौद्धेतर विशेषता ब्राह्मणी धर्मपंडितांकडे आहे. ही बाब जगातील सर्वच व्यक्तींना खटकत असून महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हे बौद्ध अनुयायांच्या देखरेखी खाली कार्यान्वित







असावे असा संविधानीक अधिकार आहे. यासाठी गेल्या अनेक वर्षापासून व्यापक लढा देखील सुरु आहे. सध्या बुद्धगया येथे जगातील सर्वच बौद्ध भिख्खूंचे प्रतिनिधी आंदोलन करत आहेत. याच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पनवेल तालुक्यातील तमाम बौद्ध बांधवाच्या वतीने आज मोर्चा यामध्ये बौद्ध समाजाच्या विविध धार्मिक सामाजिक ,चळवळीतील पक्षाचे नेते कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला होता यावेळी आर पी आय पनवेल महानगर पालिका क्षेत्र अध्यक्ष प्रभाकर कांबळे , जेष्ठ पत्रकार निलेश सोनावणे, मुलगंध कुटी विहार ट्रस्ट चे अध्यक्ष दिनेश जाधव ,भीमशक्ती संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष सुभाष गायकवाड,परिवर्तन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष महादेव



बुद्धगयांचे महाबोधी विहार हे आमच्या बौद्धांचे असून या बुद्ध विहारामध्ये इतर धार्मिक पंडित यांनी कब्जा केलेला असून म्हणून बिहार सरकारने लवकरात लवकर टेम्पल ॲक्ट रद्द करावा

**प्रभाकर कांबळे**
**आरपीआय महानगरपालिका जिल्हाध्यक्ष**

वाघमारे, ,मोहन गायकवाड माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार ,एकनाथ गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे महेंद्र मोरे, कोमोठे रिपाई शहर अध्यक्ष मंगेश धिवार, स्वाभिमानी युथ रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंके रायगड जिल्हा रिपब्लिकन सेना उपाध्यक्ष सुधीर पवार , प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे अध्यक्ष कुणाल लोंढे , नरेंद्र गायकवाड ,संदीप भालेराव , मिलिंद कांबळे सुरेंद्र सोरटे , बाबू गायकवाड,अनुराधा कीर्तने ,शारदा शिरोळे, ,राज सदावर्ते , कामगार नेते अनिल जाधव ,राहुल गायकवाड ,राजेश खंडागळे ,रायगड जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव , आदींसह धार्मिक सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**दैनिक युवक आधार -** हरिग्राम ग्रामपंचायत मा सरपंच श्री नरेशशेठ मोरबेकर यांचे सुपुत्र कु सुमित नरेश मोरबेकर हा आर्किटेक्ट परिक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन करताना श्री संतोष हरिभाऊ पाटील (संचालक रायगड जिल्ह्य मध्यवर्ती सह बँक अलिबाग

# महापालिकेच्या ज्युनिअर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रियेला 24 मार्चपासून सुरूवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्यावतीने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शैक्षणिक वर्ष 2025-2026 या वर्षाकरिता ज्युनियर केजीच्या वर्गामध्ये प्रवेश प्रक्रियेला 24 मार्चपासून सुरूवात होणार आहे. इच्छुक पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश अर्ज भरावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्यावतीने 2022 मध्ये इंग्लीश मिडीयम शाळा लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयांमध्ये सुरू करण्यात आली. मा. आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे हे चौथे वर्ष सुरू आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये ज्युनियर के.जी. वर्गाची 40 विद्यार्थ्यांची ( 20 मुले व 20 मुली) क्षमता असणार आहे. पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील विद्यार्थ्यांना सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये प्राधान्य राहील. या वर्गाची 24 मार्चपासून या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात होणार आहे.

ज्युनियर के.जी. मध्ये प्रवेश घ्यावयाच्या बालकाचा जन्म दिनांक 01 जुलै 2020 ते दिनांक 31 डिसेंबर 2021 म्हणजेच दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजीचे किमान वय हे 4 वर्ष व कमाल वय 5 वर्ष 5 महिने इतके असणे गरजेचे आहे.

**प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे**

1.बालकाचे जन्म प्रमाणपत्र.
2.बालकाचे आधार कार्ड.
3.पालकाचे आधार कार्ड/ मतदार ओळखपत्र.
4 पालकांचे वार्षिक उत्पन्न असलेला तहसिलदारांचा दाखला. (एक लाखांपेक्षा कमी)
5.पालकाचे रहिवासी पुरावा म्हणुन रहिवासी दाखला/ विजबील / टेलिफोन बिल / पाणीपट्टी / रेशनिंग कार्ड/ वाहन चालविण्याचा परवाना / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक यापैकी कोणतेही एक कागदपत्र.
6.प्रवेश अर्ज कार्यालयातून घेतेवेळी बालकाचा जन्म दाखला झेरॉक्स व पालकांचा रहिवासी पुरावा सोबत असावा तरच प्रवेश अर्ज दिला जाईल.

प्रवेश अर्ज मिळण्याचे ठिकाण-लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल व आगरी समाज हॉल समोर, पनवेल – 410 206.

**संपर्कासाठी मोबाईल नंबर** - प्राजक्ता महाडिक – 8879880226 तेजस खोचे –7776859549

प्रवेशअर्ज भरण्याची सुरुवातीची तारीख-दि.24 मार्च 2025

प्रवेश अर्जभरण्याचा अंतिम तारीख –दि. 09 एप्रिल 2025.

प्रवेश फॉर्म वाटप व स्विकरण्याची वेळ - सकाळी 10 ते दुपारी 1.00



ज्युनियर के.जी. करिता लॉटरीची तारीख व वेळ - दि. 16 एप्रिल 2025, सकाळी 11.00 वाजता.

# दंगलीचा वणवा वेळेत रोखला; हिंसाचारात अनेकांचे वाचले जीव

**नागपूर** : एकीकडे सकाळपासून कर्तव्यावर असल्याने आलेला शीण आणि दुसरीकडे पोटात अन्नाचा कणदेखील नाही अशी अडचण, तर दुसरीकडे नागपूरच्या संस्कृतीला काळिमा फासण्यासाठी सरसावलेला समाजकंटकांचा जमाव. स्वतःच्या अडचणींपेक्षा कर्तव्याला जास्त महत्त्व देत चिटणीस पार्क, भालदारपुरा, हंसापुरी या भागात सोमवारी रात्री पोलिसांनी जीव धोक्यात टाकून धाव घेतली व जमावाच्या दगडफेकीला स्वतः सामोरे गेले. महालात संघर्ष पेटला हे वास्तव असले, तरी दंगलीचा वणवा रौद्र रूप घेऊन कुणाच्या जिवावर उठण्याअगोदर पोलिसांनी त्याला रोखले. जिवावर उदार होऊन पोलिसांनी संघर्ष थांबविला व त्यामुळे मंगळवारी दिवसभर संवेदनशील भागात शांतता दिसून आली. पोलिसांच्या भूमिकेबाबत राजकीय मतमतांतरे असली, तरी नागरिकांमध्ये मात्र हॅट्स ऑफ टू नागपूर पोलिस असाच सूर दिसून येत आहे. चार



वाजेपर्यंत पोलिसांच्या कोम्बिंग ऑपरेशन व मदतकार्य 'ऑन द स्पॉट' नोंद केले. रात्री साडेआठ वाजता शिवाजी पुतळा चौक व चिटणीस पार्क चौकात आगडोंब उसळल्यानंतर शहरातील सर्वच झोनमधील अधिकारी, कर्मचारी पोहोचले. पोलिसांसमोरील सर्वात मोठे आव्हान समाजकंटकांना थांबवून इतर जमावाला शांत करण्याचे होते. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, सहपोलिस आयुक्त निसार तांबोळी यांच्यासह सर्वच उपायुक्त, सहायक आयुक्तांनी यात पुढाकार घेतला. अक्षरशः समाजकंटकांच्या दगडफेकीलादेखील ते सामोरे गेले.

**जीव संकटात टाकत राबविले कोम्बिंग ऑपरेशन**

रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास पोलिसांनी भालदारपुऱ्यात कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यास सुरुवात केली. अनेक समाजकंटक लहान गल्ल्यांमध्ये लपले होते व त्यांचे साथीदार वरील मजल्यांवर बसले होते. पोलिस समाजकंटकांचा शोध घेत पोहोचताच वरील मजल्यांवर मोठमोठे दगड, टाइल्सचे तुकडे फेकण्यात येत होते. यात महिला, पुरुष पोलिस कर्मचारी जखमीदेखील झाले. प्रतिनिधीच्या डोळ्यासमोर एका पोलिस अधिकाऱ्याच्या तोंडावर दगडाचा प्रहार झाला. मात्र, वेळ आल्यावर पोलिसांनी चक्क वाहन चालविण्याचे हेल्मेट डोक्यात घालत कोम्बिंग ऑपरेशन राबविले व ५० हून अधिक समाजकंटकांना ताब्यात घेतले. सोमवारी सकाळी सातपासून कर्तव्यावर असणारे काही अधिकारी-कर्मचारी तर मंगळवारीदेखील निरंतर ड्युटीवर दिसून आले.

**भालदारपुऱ्यातील लोण पोहोचले हंसापुरीत**

पोलिसांचे रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास भालदारपुरा व आजूबाजूच्या परिसरात कोम्बिंग ऑपरेशन सुरू होते. पोलिस आयुक्त स्वतः त्याचे नेतृत्व करत होते. त्यावेळी हंसापुरीत समाजकंटकांच्या जमावाने काही घरांवर हल्ला केला. पोलिसांपर्यंत याची माहिती पोहोचली, मात्र बहुतांश अधिकारी-कर्मचारी संवेदनशील भागातच असल्याने तिथपर्यंत पोहोचायला उशीर झाला. तोपर्यंत हंसापुरीत दुचाकी, चारचाकी वाहने जाळण्यात आली होती. मात्र, पोलिस वेळेत पोहोचल्याने उग्र जमावाला पांगविण्यात यश आले. अन्यथा तेथे घरे जाळण्याची तयारी करूनच समाजकंटक पोहोचले होते.

**तीन नव्हे चार उपायुक्त जखमी**

पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांच्या हातावर धारदार शस्त्राने वार झाल्याने ते जखमी झाल्याचे वृत्त 'लोकमत'ने प्रकाशित केले. त्यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, त्यांच्यासोबतच उपायुक्त अर्चित चांडक यांच्या लिगामेंटला दुखापत झाली, तर उपायुक्त शशिकांत सावत यांचा पाय फ्रॅक्चर झाल्याची माहिती पहाटे पोलिस आयुक्तांनी दिली. याशिवाय झोन दोनचे उपायुक्त राहुल मदने यांच्या तोंडावरदेखील जमावातील एकाने दगडाने प्रहार केला व त्यात त्यांना चांगलाच मुका मार बसला.

# कोमसाप उरणकडून धवलारीणींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

आगरी,कोळी आणि कराडी या जातीमध्ये लग्न विधीत हळद आणि देवादिकांच्या विधी करण्याचे काम करणाऱ्या ज्या महिला जी गाणी गातात त्याला " धवला " आणि तो गाणारनींना धवलारीण म्हणतात त्या वृद्ध स्त्रियांना जीवनगौरव पुरस्काराने मान्यवरांच्या शुभ हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.हा सत्कार ,दर महिन्याच्या १७ तारखेला होणा-या विमला तलाव उरण येथील मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ कवी संजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लेखिका शर्मिला गावंड ,संपदा पाटील इ.नी केला.\ विमला तलाव मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिक आणि रसिकांना कविसंमेलन आणि विविध उपक्रमातून आनंद देण्यासाठी कोमसाप अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे आणि मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे ,उरण कोमसाप,रायगडभूषण प्रा.एल. बी.पाटील यांच्या मार्गदर्शनात प्रयत्न करत असतात.यावेळी २७ बालकवींना कविसंमेलनातून रसिकांपुढे आणले. तसेच तालुक्यातील करंजा येथील अनुबाई पांडुरंग ठाकूर, केळवणे येथील चंद्राबाई गणपत पटील आणि कुंडेगावच्या कुसुम काशिनाथ पाटील या तीन वृध्द धवलारीणींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी धवलारीणींनी धवला गाऊन श्रोत्यांना आगळा आनंद दिला.बालकवी अनुज शिवकर याने शिव गौरव गीत गाऊन प्रसन्न केले अनामिका राम या बालकवयित्रीने आणि अन्य बालकवींनी आपल्या स्वरचित कवितेने भारावून टाकले. "उपक्रमांची वारी " च्या गुणी शिक्षिका असलेल्या लेखिकेला आणि मेहनती शिक्षिका संपदा पाटील यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.तसेच दोहे लिहिणा-या न.ग.पाटील यांना रायगडभूषण प्रा एल बी पाटील यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना जोशी केली यांनी अतिशय छान केले.म.का.म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



दखल

## भर रस्त्यावर ट्रक चालकाचा बेजबाबदार पणा;ओव्हर हाईट माल रस्त्यावर...

### चालत्या ट्रक मधून रस्त्यावर माल पडला जीवितहानी टळल्याचे समाधान

**प्रतिनिधी वार्ताहर**



पनवेल तालुक्यातील कोन सावळा मार्गावरील नारपोली या वळणाच्या उतरावर ट्रक न. UP /75 /4835 ट्रक ड्रायव्हर ने बेजवाबदार पणे ओव्हर हाईटचा माल भरल्याने तो वळणावर तोल जाऊन रस्त्याच्या मधोमध पडल्याने अपघात होता होता वाचला.पडलेला माल खराब न व्हावा म्हणून त्याने वाहन बाजूला न घेता बिनदास पणे मधोमध उभा ठेवला .त्यामुळे एक कडून चढ व दुसरी कडून उतार असलेल्या वळण रस्त्यावर अनेक प्रवासी वाहन धारणकांचा ट्रक ड्रायव्हर ने 1 तास जीव धोक्यात ठेवला होता . ओव्हर हाईट साठीच्या तुटपुंज्या दंडात बिनदास पणे वाहन कायदा मोडणारे ट्रान्सपोर्ट कर्मचारी मुळे रस्त्यावर आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ शकते . त्या ठिकाणी भर रस्त्यावर धोका दायक असे वळण असताना ही कायद्याची व सुरक्षितेची परवा न करता निवांतपणे रस्ता अडवून हमाल आणण्यासाठी गेलेला ड्राइवर म्हणजे प्रवाश्यांसाठी मृत्यू घंटाच चालू होती. असे ड्राइवर असुरक्षित प्रवास करुन कोणाचा जीव घेईल या बाबतीत चिंता वाटावी अशी माहिती ड्राइवरच्या सहाय्यकाने पत्रकार साबीर शेख यांना दिली.

ड्राइवर , ट्रान्सपोर्टर व कंपनीचा बेजवाबदार पणा म्हणजे कमी पैशात जास्त माल वाहतूक करण्यासाठी केलेल्या या ओव्हर हाईट च्या उपायोजना .यावर कोन ट्रॅफिक वाहतूक नियंत्रण विभागा कडे तक्रार करण्यात आली. आता त्या वर असा माल वाहतूक करणाऱ्या ट्रान्सपोर्ट तसेच माल देणारा कंपनी व्यवस्थापना वर काय कार्यवाही होईल याच्या कडे वृत्तवाहिनि प्रतिनिधी पाठ पुरावा घेत आहे .

## अड. सचिन देवांग यांची राष्ट्रीय सचिव (संघटन) पदी नेमणूक...!

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**



देश विदेशात विणकर देवांग व कोष्टी समुदायाचे संघटन *ऑल इंडिया देवांग देवांगण कोष्टी कोष्टा फेडरेशन* मार्फत हंपी (कर्नाटक) मठाधीश, देवांग जगद्गुरू *श्री. श्री. श्री. दयानंद पूरी महास्वामीजी* यांचे मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

कोष्टी व्हिजन ट्रस्ट (केव्हीटी) चे माध्यमातून सुरु असलेल्या समाज कार्याची दखल घेऊन दारव्हा, जि.यवतमाळ येथे रविवारी दिनांक १६ मार्च रोजी झालेल्या मेळाव्यात वंदनीय स्वामीजी यांचे हस्ते अड. सचिन देवांग (टकले) यांना नेमणूकीचे पत्र देण्यात आले. आपल्या समाजाच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक रचनेत योगदान देणे, सर्व विणकर देवांग व कोष्टी कुटुंबातील सदस्यांना जोडणे, सामुदायिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि आपला समृद्ध वारसा जपण्यासाठी एकमेकांना पाठिंबा देण्यास प्रवृत्त करणे, तसेच एक मजबूत, एकजूट आणि शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध समुदाय निर्माण करण्यासाठी एकत्र काम करून स्वामीजींच्या शिकवणी आणि आशिर्वादांचा आदर करणार असल्याचे राष्ट्रीय सचिव (संघटन) पदी नेमणूक झाल्यानंतर देवांग यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरुणराव वरोडे व जनरल सेक्रेटरी श्री. नारायणराव वडड्डे उपस्थित होते.

## आजीवली येथील गोकुळमध्ये भक्तिभावाने सत्संग कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



आजीवली येथील गोकुळ कॉम्प्लेक्समध्ये संत निरागम समागम कार्यक्रम भक्तिभावाने पार पडला.रविवारी सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत प्रचारक प्रकाश पार्लेजी यांच्या उपस्थित पार पडला.या ठिकाणी आजीवली व परिसरातील मधील सर्व भाविक उपस्थित होते. प्रथमतः देवाचे भजन बोलून कार्यक्रमास सुरवात झाली.सर्व भाविकांनी महाराजाचे दर्शन घेतले. प्रचारक प्रकाश पार्लेजी यांनी मनुष्य देह परमेश्वराने दिला आहे याचे विस्तृत माहिती सांगितली. त्यांनी ज्ञानकशा मध्ये सत्संगची उद्देश सांगितले. त्यानंतर येणाऱ्या सर्व भाविकांना प्रसादी ठेवण्यात आली होती.तसेच सत्संगच्या सेवादलाने मंडप,लाईट, डेकोरेशन साहित्य, सर्व नियोजन योग्यरीत्या पार पाडले.

# उन्हामुळे गरीबांच्या फ्रिजला मागणी वाढली

## माठाची किमतही सर्वांना परवडणारी...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**

**शिरूरआनंतपाळ :** लातूर दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालल्याने गरीबांचा फ्रीज म्हणून ओळख असलेल्या मातीच्या माठाला शहरी भागासह ग्रामिण भागातील बाजारात मागणी वाढली आहे. माठाची किमत आपल्या आवाकात असल्याने ते खरेदी करतानाही ग्राहक दिसत आहेत. शिरूरआनंतपाळ तालुक्यात साकोळ व येरोळ प्रत्येक मंगळवारी व बुधवारी शिरूरआनंतपाळ शहरात आठवडी बाजार भरतो. या बाजारात जवळपासच्या खेड्यातील नागरिक आठवडी बाजार करण्यासाठी येत असतात यामुळे माठ



विक्रेत्यानी मातीचे माठ व रांजण विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत.

सध्या उन्हाचा पारा वाढत चालला आहे. मार्च महिना सुरू असून, एप्रिल मे पर्यंत अतिशय कडक उन्ह असते. त्यामुळे सध्या बाजारात मातीपासून तयार करण्यात आलेल्या माठांना मागणी वाढली आहे. कितीही कडक उन्हाळा असला तरी माठातले थंडगार पाणी पिले तर उन्हाळा तितकासा त्रासदायक जानवत नाही. म्हणून बाजारात या माठाना मोठी मागणी आहे. सध्या बाजारात १५ लिटर पाणी बसणाऱ्या माठाची किमत २०० ते २५० रुपयांला विक्री केली जात आहे तर मोठा रांजन एक हजार रुपयाच्या पुढे आहे.

**माठातील पाणी पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत....**

माठातील पाणी नैसर्गिकरित्या थंड असते.

माठातील पाणी पिल्याने शरीरातील आंतरिक उष्णता कमी होते.

माठातील पाणी पिल्याने पचनशक्ती सुधारते.

डोकेदुखी आणि टॉन्सिलसारख्या समस्या उद्भवत नाहीत.

माठातील पाणी पिण्यामुळे शरीरात रोगांशी लढण्याची क्षमता वाढते.

माठातील पाणी पिण्यामुळे शरीरात आवश्यक खनिजे आणि जीवनसत्वे मिळतात.

माठातील पाणी पिण्यामुळे शरीरातील ॲसिडिक वातावरण कमी होते.

माठातील पाणी पिण्यामुळे शरीरातील वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन राहते.

## आम्ही मैत्रिणी योग ग्रुप व महिला पतंजली योग समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली वार्ताहर**



दोन वर्षांपूर्वी दोन वर्षांपूर्वी सिडको गार्डन रोडपाली सेक्टर २०येथे डॉ. प्रभा वाडकर यांनी शोभा सावळकर व इतर चार जणी मिळून गार्डनमध्ये योग प्राणायाम सुरु केला या ग्रुप मध्ये 60 हुन अधिक महिला जोडल्या गेल्या आहेत. या योग ग्रुप च्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत आम्ही मैत्रिणी योग ग्रुप व महिला पतंजली योग समिती पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने चाळिशीनंतर महिलांनी आपले आरोग्य कसे सांभाळावे " या विषयावर डॉ सागर सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते .त्यामध्ये आनंदी आणि तणावमुक्त जगण्यासाठी आपल्या आरोग्याची आपणच काळजी घ्यावी. बदलत्या जीवनशैलीत मोसमी फळे , पालेभाज्या युक्त सकस आहार, व्यायाम, सकारात्मक असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. "कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला पतंजली योग समितीच्या राज्य प्रभारी सुनिता नानोटे होत्या. यावेळी ऍड सुवर्णा यादव यांनी ," महिलांनी अत्याचार सहन न करता कायद्याची निर्भयपणे मदत घ्यावी. कायदे स्त्रियांच्या बाजूने असून वेळीच गुन्ह्यांची नोंद झाल्यास न्याय मिळणे सुलभ होते . आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिलांना विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत सल्ला व मदत मिळू शकते असे सांगत वारसा हक्क, कौटुंबिक हिंसाचार , सायबर गुन्हे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.अध्यक्षीय समारोपात सुनिता जी नानोटे यांनी भारतीय परंपरेचे महत्व विशद केले.महिला पतंजली योग समिती पनवेलच्या जिल्हा प्रमुख छायाजी जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांचे स्वागत शोभा सावळकर , उर्मिला पाटील, प्रमिला वैदीकर,बारकाबाई यांनी केले . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, आभारप्रदर्शन डॉ. प्रभा वाडकर यांनी केले.या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत योग शिक्षिका मीना अग्रवाल व मंगल ,सुजाता , साखरे ,राजश्री , वर्षा,रेणू ,आशा यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला . या वेळी आदर्श महिलांना प्रातिनिधिक स्वरूपात, मां जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, आनंदीबाई जोशी यांच्या भूमिका छोट्या मुलींनी साकारल्या .कु. श्रेया वाडकर ( मां जिजाऊ ), कु.आशी ( अहिल्याबाई),कु .जिया वानखडे ( सावित्रीबाई ) ,कु.जिया नायकरे यांनी या भूमिका साकारल्या

## औरंजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी विहिंप व बजरंगदल चे तहसीलदारांना निवेदन...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.नामदेवराव.मंडपे.मंठा**



**मंठा:-**कुरकर्मा औरंजेबाची कबर शासनाने हटवावी, नसता आम्ही हटवतो, असा ईशारा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने मंठा तहसील येथे आंदोलनप्रसंगी दिला आहे. औरंगजेबाच्या कबरीबाबत उद्भवलेल्या विषयाच्या अनुषंगाने आज सोमवारी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पुष्पहार घालून व मंठा तहसिल कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, औरंगजेब हा हिंदुव्देष्टा होता. त्यामुळे त्याची कबर हटविणे आवश्यक आहे. त्याने केलेले अन्याय-अत्याचार आजही हिंदु विसरेलेले नाहीत. शिख धर्मगुरूंची त्याने केलेली हत्या आणि हिंदु मंदीरांवर केलेले हल्ले लक्षात घेता त्याच्या कबरीची आपल्याला कुठलीही गरज नाही. त्याने काशी येथे विश्वेश्वर मंदीरावर हल्ला करून मथुरेतील मंदीरांचा उध्दवंस केला आहे. अनेक हिंदूंची त्याने हत्या केली असून, छत्रपती संभाजीमहाराजांना दिलेल्या मरणयातना आजही हिंदू विसरलेले नाहीत. त्यामुळे त्याची कबर नष्ट होणे आवश्यक असून, त्याबाबत योग्य वेळेत निर्णय न घेतल्यास विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल संभाजीनगरकडे कूच करेल आणि ही कबर नष्ट करतील, असा ईशारा या निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. या निवेदनावर विश्व हिंदू परिषदेचे राधाकिसन बोराडे,डिगंबर मुळे,आसाराम काकडे,संदीप गायकवाड, संजय गायकवाड, सतीशराव निर्वळ, सुदर्शन बोराडे,अमोल वरकड, भक्तीराम बोराडे, विशाल राठोड, नरेश सांगोळे, बोराडे ज्ञानेश्वर, वैभव बोराडे,राहुल चव्हाण,किरण सोनार,कृष्णा बोराडे,सुमित जोशी,सखाराम बोराडे,योगेश बोराडे, स्वप्नील देशमुख, सचिन गुजर,संतोष तिवारी,पांडुरंग पारखे,अंजीराम डाके,उमेश पीसे, वैभव काळे, पवन जाधव,सौरभ चाकरे, शिवहारी,स्वप्नील घारे,बाळासाहेब खरात यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पाटोदा येथील पत्रकार भवनांचा प्रश्न मार्गी लावावा.

**पाटोदा येथील आमसभेत पत्रकार ॲड.महेश बेदरे यांची आमदार सुरेश धस यांच्या कडे मागणी**

**दैनिक युवक आधार**



**पाटोदा (प्रतिनिधी) -** लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांसाठी पाटोदा शहरात मागील अनेक वर्षांपासून मागणी असताना कोणतीही हक्काची जागा उपलब्ध नाही. पत्रकार भवनाच्या मागणीसाठी अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी वेळोवेळी निवेदने पत्र दिलेले आहेत परंतु या संदर्भात प्रशासकीय स्तरावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. पत्रकारांसाठी हक्काची जागा उपलब्ध व्हावी या साठी आपण स्वतः दखल घेऊन या संदर्भात प्रयत्न करावेत अशी मागणी बीड जिल्हा पत्रकार संघाचे पाटोदा तालुका अध्यक्ष अड. महेश बेदरे यांनी केली आहे. पाटोदा शहरात १६ मार्च रविवार रोजी आष्टी /पाटोदा /शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश(आण्णा) धस यांची आम सभा पार पडली. या आमसभे प्रसंगी पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात बोलताना पत्रकार ॲड.महेश बेदरे यांनी सांगितले की पत्रकार भवनाच्या प्रश्नासाठी १९९२-९३ या वर्षांपासून पाटोदा शहरातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी मागण्या केल्या आहेत,पाटोदा शहर व परिसराला प्रतिभा संपन्न पत्रकारांचा समृद्ध वारसा आहे. ज्येष्ठ पत्रकार सोमीनाथ कोल्हे, इद्रीस भाई चाऊस, कादर मकरानी, विजय जोशी, दयानंद सोनवणे, तुकाराम तुपे, यांच्या सह अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी या सदर्भात वेळोवेळी निवेदने पत्र शासनाला दिलेली आहेत. त्या वेळी शासनाने गट नंबर ३२९ मधील काही जागा शिल्लक असल्यास त्याची चाचपणी करावी अशी जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते. परंतु त्या नंतर प्रशासकीय उदासीनतेमुळे या संदर्भात कोणतीही हालचाल आत्तापर्यंत होऊ शकली नाही. आता आमदार सुरेश धस हे स्वतः या भागाचे लोकप्रतिनिधी असून जनतेच्या समस्या रोज मांडणाऱ्या पत्रकारांची ही महत्त्वाची मागणी ते मार्गी लावतील अशी आशा व विश्वास या वेळी ॲड.बेदरे यांनी व्यक्त केला. या वर उत्तर देताना आमदार सुरेश धस यांनी देखील पत्रकार भवनाच्या संदर्भात आपण येत्या काळात योग्य ती कार्यवाही करू मी आज कोणताही जाहीर शब्द देत नाही परंतु या संदर्भात पुढील काळात पत्रकारांच्या मागणीची निश्चित सकारात्मकपणे दखल घेतली जाईल. असे आश्वासन या वेळी आमदार सुरेश धस यांनी दिले.

## तप्त उन्हात ऊसाच्या रसाचा थंडावा ;थंडगार ऊस रस प्राशनाकडे वाढता कल

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



गेल्या आठ दहा दिवसांपासून अचानक तापमानात वाढ झाली असून मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाळ्याच्या झळा बसू लागल्या आहेत. त्यामुळे घशाला कोरड पडत आहे. चौकात दुपारच्या सुमारास एखाद्या ठिकाणी घुंगरांचा आवाज येताच अबालवृद्धांची पावले आपोआप रसवंती गृहांकडे वळू लागली आहेत. रखरखत्या उन्हात थंडगार, सुमधूर ऊसाचा रस त्यांना थंडावा देत आहे.उन्हाळ्याच्या हंगामाला साधरणतः मार्चमध्ये सुरुवात होत असते. मात्र मागील काही वर्षांपासून फेब्रुवारी महिना देखील उकाड्यात जात असतो. मार्च महिन्याला नुकतीच सुरुवात झाली असून उन्हाळ्याचीही तीव्रता हळूहळू वाढू लागली आहे. उष्णतेच्या पाऱ्याने ३४ अंशाचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेस घराबाहेर पडणेही आता नागरिकांना असह्य होऊ लागले आहे. उन्हाळ्यात उसाच्या रसाला खूप मागणी असते. हा रस पिण्याकडे नागरिकांचा सर्वाधिक कल असतो. कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्यांना शीतपेये, रसवंतीगृहे दिलासा देत आहेत.

*खिशाला परवडणारा रस*

कृत्रिम घटक वापरुन तयार केलेले असंख्य शीतपेये बाजारात आहेत. त्यांच्या सेवनानंतर तात्पुरते बरे वाटत असले तरीही आरोग्याच्यादृष्टीने फारसे चांगले मानले जात नाही. याशिवाय ही पेये काहीशी महागही असतात. या उलट ऊसाचा रस हा नैसर्गिक असतो. तो विशेषत बर्फाशिवाय प्यायल्यास शरीराला अपायकारक ठरत नाही. तसेच त्याचे दरही खिशाला परवडेल असेच असतात. शरीराचे तापमान योग्य राहण्यासाठी ऊसाचा रस फायदेशीर ठरतो. आजकाल खिशाला परवडणाऱ्या किंमतीमध्ये अवघ्या पंधरा ते वीस रुपयांमध्ये उसाचा रस उपलब्ध होतो. कडक उन्हामध्ये नैसर्गिक थंडगार पेय म्हणजे अमृता समान आहे. उसाच्या रसामधील पोटॅशियम आणि फायबरमुळे पचन शक्ती वाढते. बऱ्याच लोकांना रसात वापरल्या जाणाऱ्या बर्फाच्या शुद्धतेबद्दल शंका असल्यामुळे ते बर्फाशिवाय रस पिण्यास प्राधान्य देतात. उसाच्या रसाची चव वाढवण्यासाठी त्यामध्ये लिंबू, आले, अननस, काळे मीठ आणि जलजीरा मसाला वापरला जातो. त्यामुळे, त्याची चव आणखी वाढते.

- ग्राहक शौर्या, प्रांजल शितल, शुभांगी.

## पैठण येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी**
**गौतम सोनवणे.**

पैठण येथे औरंगाबाद येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे उद्घाटन, उच्च न्यायालय मुंबई न्यायमूर्ती रवींद्र विठ्ठलराव घुगे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमास अतिथी म्हणून उच्च न्यायालय मुंबई न्यायमूर्ती यनशिवराज गोपिचंद खोब्रागडे, उच्च न्यायालय मुंबई न्यायमूर्ती संजय आनंदराव देशमुख व बार कौन्सिल महाराष्ट्र आणि गोव्याचे सदस्य माननीय वंसतराव सोळुंके हे उपस्थित होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश औरंगाबाद श्रीमती विभा प्रभाकरराव इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पैठण येथे दि.१६ मार्च रविवार रोजी सकाळी दहा वाजता दिवाणी व फौजदारी न्यायालय परिसर पैठण तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद येथे संपन्न झाला. याबाबतची माहिती पैठण वकील संघाचे सचिव ॲड. सुभाष खडसन यांनी दिली. यावेळी कार्यक्रमास उपस्थित पैठण न्यायालयाचे न्यायाधीश राजेश्वर गाढवे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश-1 पैठण, मा. न्यायाधीश श्रीमती रोकडे, श्री. कनकदंडे, श्रीमती. बाफना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे, आमदार विलास भुमरे, एसडीएम निलम बाफना, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग, डीवायएसपी सिध्देश्वर भोरे, पोलीस निरिक्षक संजय देशमुख, पैठण तहसिलदार दत्ता भारस्कर, न.प. मुख्याधिकारी संतोष आगळे, एमआयडीसी सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे, दुध संघाचे नंदलाल काळे, माजी राज्यमंत्री अनिल पटेल, माजी आमदार संजय वाघचौरे, दत्ता गोर्डे, डॉ. राम लोंढे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, शहादेव लोहारे, वकील संघाचे अध्यक्ष संदिप जाधव, सचिव अड. सुभाष खडसन, ॲड.पहिलवान, अड काकडे, अड गायकवाड, अड गवांडे, अड गव्हाणे, अड फकिरा, अड बागवान, अड धायकर, अड भसमे, अड सानप, अड वाहुळ, अड पल्लोड, अड इमरान, अड शाईन, अड शिंदे, अड. गायकवाड, अड



खंडागळे, अड पारवे, अड नरवडे, ॲड.बागवान, ॲड.पटेल, ॲड.गोरडे, ॲड. वाकडे, ॲड. जोशी, ॲड.वैदय, ॲड.शेवतेकर, ॲड.उगले, ॲड.नलावडे, ॲड.नाडे, ॲड. सय्यद, ॲड. धरपळे,ॲड.गोरे ॲड.जगताप ॲड.धरपळे,ॲड. कडेठाणकर ॲड.इनामदर,ॲड.बाबर ॲड. सय्यद, ॲड.बडे, ॲड. चव्हाण, ॲड.मुळे, ॲड.जगताप, ॲड.साबु,ॲड.पाटील,ॲड. भागवत,ॲड.पंडुरे ॲड.बोबडे,ॲड.नवले,ॲड. फुंदे,ॲड.शेजवळ,आदिंसह वकील संघ पैठण, शहरातील व तालुक्यातील सर्व नागरिक, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सर्व वकील संघातील अध्यक्ष, वकील संघातील सदस्य व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## "एक शहर, एक शिवजयंती" सोहळ्याची दैदिप्यमान यशस्वीता





**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या सकल हिंदू उत्सव समितीच्या वतीने "एक शहर, एक शिवजयंती" सोहळ्याचे आयोजन कामोठे या ठिकाणी करण्यात आले होते यावर्षीचे हे चौथे वर्ष मोठ्या उत्साहात आणि थाटात पार पडले. दिनांक 17 मार्च 2025 (फाल्गुन वैद्य तृतीया) रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, कामोठे पोलीस स्टेशन समोर या ठिकाणी भरवलेल्या या सोहळ्याने शिवप्रेमींच्या हृदयात अभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. या सोहळ्यात शाहीर यशवंत जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या शाहिरी कार्यक्रमाने शिवचरित्राची प्रेरणादायी अमुल्य शिकवण प्रेक्षकांच्या मनामध्ये कायमस्वरूपी कोरली. या सोहळ्यात भजनी मंडळ, लाठीकाठी, तलवारबाजी पथक, शस्त्रपथक, हिरकणी लेझीम पथक व बोथाडी पथक यांच्या प्रात्यक्षिकाने कार्यक्रमाला वेगळा नूर प्राप्त झाला. संस्कृती आणि परंपरेचा अभिमान जपत समितीने नेहमीच काहीतरी आगळेवेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे कामोठे शहरात शिवमय वातावरण झाले होते या सोहळ्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या सोहळ्याच्या भव्य यशामागे कामोठे शहरातील शिवप्रेमींचे अथक सहकार्य असून, पोलीस प्रशासन, महानगरपालिका तसेच या भव्य दिव्य सोहळ्यास विविध स्तरातून मदतीचा हात पोहोचवणाऱ्या सर्वांचे आभार समितीने व्यक्त केले.

आगामी वर्षी शिवजयंती अधिक भव्य स्वरूपात साजरी करण्याचा निर्धार समितीने केला आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# अनियमित ह्रदयाच्या ठोक्यांमुळे अंथरुणाला खिळलेल्या 71 वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार

## मेडट्रॉनिक मायक्रा ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकरचे यशस्वी प्रत्यारोपण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** ह्रदयाचे ठोके हे मिनिटाला 60 पडणे आवश्यक असते मात्र जेव्हा काही रुग्णामध्ये ते अनियमित असतात तेव्हा त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. अशा रुग्णाला ऱ्हदयाचे ठोके नियमित करण्यासाठी पेसमेकर लावला जातो. अशाच एका 71 वर्षीय रुग्णावर कोणतीही शस्त्रक्रिया, चिरफाड न करता मेडिकवर हॉस्पिटलचे वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे यांच्या नेतृत्वाखाली टिमने मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकरचे इम्प्लांट केले. ज्यामुळे ह्रदयाचे ठोके नियमित होऊन त्याचे प्राण वाचविण्यात डॉक्टरांना यश आले. रुग्ण आता पूर्णतः बरा झाला असून शस्त्रक्रिया न करता त्याने त्याचे दैनंदिन जीवन पुन्हा सुरू केले आहे. ह्रदयाचे ठोके कमी असतील तर ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे श्वास अडतो, चक्कर येते. अशीच घटना खारघर येथील रुग्ण श्री. बिमल तिवारी यांच्यासोबत घडली असून यामुळे हळूहळू त्यांचे दैनंदिन जीवन आव्हानात्मक होऊ लागले. त्यांना कोणत्याही आधाराशिवाय चालणे अशक्य झाले होते आणि त्यांना मुर्च्छा येऊन पडण्याची भीती वाटत होती. दैनंदिन



कामांसाठी त्यांना त्याच्या कुटुंबावर अवलंबून रहावे लागत होते. श्री तिवारी यांना कोरोनरी अँजिओग्राफी आणि पेसमेकर इम्प्लांटेशनसाठी दुसऱ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, ही प्रक्रिया त्यांना त्यांचे जीवन परत मिळवून देऊ शकली असती. परंतु त्याचवेळी डॉक्टरांना आढळले की त्यांना गंभीर थ्रोम्बोसाइटोपेनिया (प्लेटलेट संख्या 60,000 हून कमी) आहे, ही अशी स्थिती आहे ज्यामुळे त्यांना जीवघेणा रक्तस्त्राव होण्याची शक्यता होती. शस्त्रक्रियेचे उच्च धोके पाहता, पेसमेकर इम्प्लांटेशन शक्य झाले नाही. त्यांची तब्येत आणखी खालावत चालली होती. त्यानंतर त्यांनी मेडिकवर हॉस्पिटलकडे धाव घेतली. अचानक बेशुद्ध पडल्यानंतर त्यांना गंभीर स्थितीत त्यांना मेडिकवर हॉस्पिटलमध्ये डॉ. केशव काळे निरीक्षणाखाली ठेवण्यात आले. आपत्कालीन परिस्थिती ओळखून, डॉ. काळे यांनी रात्रीच्या वेळी तात्पुरते पेसमेकर इम्प्लांटेशन केले, ज्यामुळे रुग्ण स्थिर झाला. केवळ 70,000 प्लेटलेट संख्या असल्याने पारंपारिक पेसमेकर शस्त्रक्रिया खूप धोकादायक ठरली असती. म्हणूनच रुग्णाची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्याच्यावर मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकर प्रक्रिया करण्याचे निश्चित केले. नवी मुंबईतील मेडिकवर हॉस्पिटलचे वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे सांगतात की, रुग्णाचा गंभीर थ्रोम्बोसाइटोपेनिया (रक्तातील कमी झालेले प्लेटलेट्स) लक्षात घेता, पारंपारिक पेसमेकर इम्प्लांटेशन करणे हा पर्याय योग्य नव्हता, कारण त्यामुळे रक्तस्त्राव होण्याचा धोका होता. मेडट्रॉनिक मायक्रा लीडलेस पेसमेकर हा त्याच्यासाठी सर्वात सुरक्षित आणि सर्वात प्रगत पर्याय होता. रुग्णाच्या कुटुंबातील सदस्यांशी आणि वैद्यकीय टिम सोबत सखोल चर्चा केल्यानंतर, लीडलेस पेसमेकर निवडण्याचा निर्णय घेण्यात आला. पेसमेकर हा ब्रॅडीकार्डियावरचा उपाय असून त्यामुळे ह्रदयाचे ठोके नियमित होतात. त्यामुळे ह्रदयाला विजेचे तरंग दिले जातात व त्यामुळे ह्रदयाचे ठोके वाढतात. कॅथेटरमधून हा पेसमेकर पाठवला जातो व ह्रदयात बसवला जातो. डॉ. केशव काळे पुढे सांगतात की , हे उपकरण लीडलेस आणि कमीत कमी आक्रमक असल्याने, गुंतागुंत होण्याची शक्यता कमी करते, सुरक्षितता आणि दीर्घकालीन कार्यक्षमता दोन्ही सुनिश्चित करते. लीडलेस पेसमेकर हे असे उपकरण आहेत जे पारंपारिक पेसमेकरच्या विपरीत ह्रदय गती सामान्य राखतात. लीडलेस पेसमेकरला ह्रदयाशी जोडण्यासाठी कोणत्याही शस्त्रक्रिया किंवा बॅटरी आणि लीडची आवश्यकता नसते. लीडलेस पेसमेकर हे असे उपकरण आहे जे कॅथेटरद्वारे उजव्या खालच्या ह्रदयाच्या चेंबरशी थेट जोडलेले असते. त्याला शस्त्रक्रिया आणि लीडची आवश्यकता नसल्यामुळे, रक्तस्त्राव, गुंतागुंत आणि संसर्ग होण्याची शक्यता कमी असते. प्रक्रियेनंतर रुग्णाचा रुग्णालयातील कालावधी कमी होतो आणि गतिशीलता सुधारते. रुग्णाला शस्त्रक्रियेनंतर फारशी काळजी घेण्याची आवश्यक नसते. कॅथ लॅबमध्ये कोणत्याही प्रकारची भूल न देता केल्या जाणाऱ्या या प्रक्रियेसाठी सुमारे 2 तास लागतात. या प्रक्रियेनंतर, रुग्णाला दुसऱ्याच दिवशी रुग्णाला घरी सोडले जाते. पारंपारिक पेसमेकरच्या विपरीत, लीडलेस पेसमेकरसाठी किमान खबरदारी घ्यावी लागते. हे प्रगत तंत्रज्ञान ब्रॅडीकार्डिया (ह्रदय गती मंदावणे) व्यवस्थापित करण्यासाठी एक उत्तम उपाय आहे. श्री तिवारींना त्यांच्या पायावर परत उभे राहून, त्यांचे सामान्य जीवन जगताना पाहणे हे डॉक्टर म्हणून आमच्यासाठी सर्वात मोठे बक्षीस आहे. ही कामगिरी रुग्णालयाच्या वैद्यकीय उत्कृष्टता आणि नाविन्यपूर्णतेचे उत्तम उदाहरण ठरले आहे. माझ्या या गंभीर आरोग्य स्थितीमुळे मी सर्व आशा गमावल्या होत्या, परंतु मेडिकवर हॉस्पिटलने मला आयुष्य जगण्याची दुसरी संधी दिली. डॉ. केशव काळे आणि त्यांच्या टीमने मला केवळ वाचवले नाही तर माझे स्वातंत्र्य देखील परत मिळवून दिले अशी प्रतिक्रिया रुग्ण श्री. बिमल तिवारी यांनी स्पष्ट केली.

## द • ख • ल

### पनवेलमध्ये 'सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयं पुनर्विकास' मार्गदर्शनपर शिबिर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादित यांच्या विद्यमाने आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने "सहकारी गृहनिर्माण संस्थांचा इमारतींचा स्वयं पुनर्विकास" या विषयावर मार्गदर्शनपर शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार दिनांक २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता पनवेल शहरातील विरुपाक्ष हॉल येथे होणार आहे. या शिबिराला मार्गदर्शक म्हणून विधानपरिषदेतील भाजप गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, सहकारी संस्था पनवेलचे सहाय्यक निबंधक भारती काटूळे यांची विशेष उपस्थिती असणार आहे. गृहनिर्माण संस्था आणि रहिवाश्यांना स्वयं पुनर्विकासाच्या संकल्पनेची सखोल माहिती मिळावी, पुनर्विकास प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, योजना आणि इतर विषयांवर या शिबिरात मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे या शिबिराचा गृहनिर्माण संस्था व रहिवाश्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, सल्लागार व माजी नगरसेवक नितीन पाटील, सचिव भरत मोरे यांनी केले आहे.

### प्रादेशिक परिवहन कार्यालयातील विविध समस्येंबाबत प्रभुदास भोईर यांनी दिले प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयातील विविध समस्येबाबत तसेच कार्यालयातील अधिकाऱ्यांना सूचना करूनही त्यात बदल होत नसल्याबाबतचे निवेदन श्रमिक संघटना अध्यक्ष प्रभुदास (अण्णा भोईर) यांना प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांची भेट घेवून त्यांना दिले. प्रभुदास भोईर पुढे म्हणाले की, प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल येथे ड्रायव्हिंग स्कूल व वाहन प्रतिनिधी यांच्या संयुक्त विद्यमाने कामा दरम्यान कार्यालयात येणारे समस्या व प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांच्याकडून वारंवार कार्यालयाच्या मंडळींना मिळणाऱ्या सूचना मिळूनही त्यात बदल होत नाही. त्यात बदल करण्यात यावा. तसेच 20 मार्च रोजी दुपारी 4 वाजता आपण आपल्या कार्यालयातील सर्व प्रमुख डिपार्टमेंट हेड यांच्या बरोबर बैठकीसाठी वेळ मिळावा. जेणेकरून कार्यालयातील समस्यांबाबत आपल्याशी योग्य प्रकारे चर्चा करता येईल. व काम कसे दर्जेदार व सुरळीत होईल ह्याकडे वैयक्तीक लक्ष घालावे अशीही विनंती केली. यावेळी संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर कॉंक्रिटीकरण भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
विंचूर दि. 17 :-विष्णुनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यासमोर ग्रामनिधीमधून कॉंक्रिटीकरण भूमिपूजन करण्यात आले यावेळी पंचायत समिती माजी सभापती शिवा सुराशे यांच्या हस्ते भूमिपूजन पार पडले व लवकरात लवकर कॉंक्रिटीकरण काम पूर्ण होईल असे ग्रामसेवक सुनील शिंदे यांनी आश्वासन दिले यावेळी संजय घायाळ तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले, ग्रामसेवक सुनील शिंदे, सूर्यभान घायाळ,आनंदा देसले, एकनाथ जेऊघाले,हेमंत घायाळ, सूर्यभान घायाळ, विलास जेऊघाले , पत्रकार राजेश भडांगे, ज्ञानेश्वर घायाळ, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल घायाळ,माधव घायाळ,रघुनाथ जेऊघाले , अर्जुन घायाळ, केदु खरे,जगन्नाथ घायाळ, साहेबराव राऊत सह विष्णुनगर ग्रामस्थ उपस्थित होते



### शिवसेना वडगावशेरी विधानसभेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी,

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वडगावशेरी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने खराडी चंदन नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले होते,

यावेळी शिवसेना शिंदे गटाचे पुणे शहर समन्वयक शंकर संगम, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते राजाभाऊ चौधरी, विनोद करताल, पुणे जिल्हा बांधकाम कामगार शेरसिंग राजपूत, वडगाव शेरी प्रभाग प्रमुख संतोष येमुल, उपविभाग प्रमुख नरेश धांदल, पुणे शहर महिला आघाडी शहर समन्वयक पद्मा शेळके, सामाजिक कार्यकर्ते राहुल ढाकरे, आत्माराम धुमाळ, रुपेश मोरे, आदि यावेळी उपस्थित होते



## दिव्यातील प्रसिद्ध व्यवसायिक भालचंद्र भगत यांचा 50 वा वाढदिवस मोठ्या जल्लोषमय वातावरणात पडला पार....

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव**
दिव्यातील प्रसिद्ध व्यवसायिक व शिवसेनेचे विभाग प्रमुख भालचंद्र भगत यांचा 50 वा वाढदिवस दिवा पश्चिम येथे खुल्या मैदानात मोठ्या उत्साहात साजरा झाला. कुटुंबीय आणि मित्र परिवारातील महिला सदस्यांनी औक्षण करून भालचंद्र यांना शुभेच्छा दिल्या.



वाढदिवसाच्या निमित्ताने अनेक सामाजिक कार्यक्रम पार पडले. दिव्यातील कल्यान ग्रामीण चे शिवसेनेचे आमदार राजेश मोरे, दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी,उपशहर प्रमुख शैलेश पाटील तसेच मुंब्रा पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांची विशेष उपस्थिती होती. भालचंद्र भगत यांच्या 50 व्या वाढदिवसा निमित्त दिव्यातील नामांकित रुग्णालयात दिवा वासियांसाठी मोफत आरोग्य शिबीर ठेवण्यात आले शिबिरात ए सी जी तपासणी, मधुमेह, रक्तदाब, बॉडी चेकअप, अन्य रोगावरील उपचार पद्धती वर तज्ञ डॉक्टरांच्या वतीने तपासणी करून मोफत औषधे देण्यात येत होती यावेळी अनेक ज्येष्ठ महिला पुरुषांनी शिबिराचा लाभ घेत भालचंद्र भगत यांना आशीर्वादरुपी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या मोठ्या मनाने भालचंद्र भगत यांनी सर्वांचे आभार मानत कृतज्ज्ञता व्यक्त केली व रात्री उशिरा पर्यन्त कार्यक्रमाची रेलचेल सुरु होती.

## बीड जिल्हा पत्रकार संघाची पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर

### सचिवपदी अमीर शेख तर शहराध्यक्षपदी सुधीर एकबोटे यांची निवड.



**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुका कार्यकारिणीची निवडी जाहीर करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व राज्य समन्वयक संतोष मानूरकर जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे, शेख रिजवान, पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे पाटोदा तालुकाध्यक्ष अँड.महेश बेदरे यांनी या निवडी जाहीर केल्या आहेत. या निवडी मध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा पत्रकार संघ सचिवपदी पत्रकार आमीर शेख यांची निवड करण्यात आली आहे. तर पाटोदा शहराध्यक्ष म्हणून पत्रकार सुधीर एकबोटे यांची निवड करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे पत्रकार संघाच्या तालुका उपाध्यक्षपदी चंद्रशेखर पवार अमळनेर विभाग तसेच पाटोदा विभागाच्या उपाध्यक्षपदी पत्रकार सय्यद रियाज यांची निवड झाली आहे. तसेच संघटक म्हणून पत्रकार शेख महेशर तर सहसचिव म्हणून प्रेस छायाचित्रकार राहुल सोनवणे यांच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांच्या सह मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## शिवशंभू शौर्यगाथा महानाट्याने शिवभक्तांच्या डोळ्याचे पारणे फेडले

### राजाभाई केणी यांचे लोकसेवेचे कार्य कौतुकास्पद - आ. महेंद्रशेठ दळवी | २६ वर्ष संस्थेकडून जनसेवेचे कार्य - जिल्हाप्रमुख राजाभाई केणी

**दैनिक युवक आधार**
**पेण प्रतिनिधि**
**किरण बांधणकर**
हेमनगर येथील शिवनेरी ग्रुप सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाई केणी व ग्रामपंचायत कुसुंबळे उपसरपंच रसिका ताई केणी त्यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त शिवशंभू शौर्यगाथा महानाट्य प्रयोगाचे भव्य दिव्य असे आयोजन सुर्या रोशनी कंपनी मैदानावर करण्यात आले होते. शिवदुर्ग मित्र प्रस्तुत व प्रविण नंदकुमार देशमुख लिखीत शिवशंभू शौर्यगाथा महानाट्याने शिवभक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्याची गाथा याची देही याची डोळा पाहण्यासाठी शिवभक्त हजारोंच्या संख्येत उपस्थित होते.



**महानाट्यातील प्रमुख आकर्षण म्हणजे** आक्रमक शौर्य लढाया,पोवाडे,लावणी, कव्वाली,२५० कलाकार,जिवंत तोफा मर्दानी खेळ,१०० फुटी भव्य दोन मजली रंगमंच, गणेशवंदना,गोंधळ आणि रंगमंचावर प्रत्यक्ष घोडे, उंट, बैलगाड्या तसेच इतिहासातील महाराजांच्या जीवनावरील शौर्यगाथा सदर करणारे ऐकून एक कलाकार यांनी हुबेहूब अंगिकारली केला अंगावर काटा आणि डोळ्यात पाणी आणणारी होती.

कार्यक्रमाला आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किसन जावळे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,भाजप जिल्हा चिटणीस महेश मोहिते,कामगार नेते दिपक रानवडे, नगरसेविका जयश्री वावेकर,शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाई केणी, रसिकाताई केणी आदी मान्यवर तसेच शिवनेरी ग्रुप संस्थेचे पदाधिकारी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**_राजा केणी यांचे कार्यकौतुकास्पद _**
शिवनेरी ग्रुप सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी लावलेले छोट्याशा वृक्षाचे आता वटवृक्ष झाले आहे. शून्यातून निर्माण होत लोकांना देण्याची दानत तसेच खऱ्या अर्थाने लोकांच्या गरजा ओळखून लोकांची प्रामाणिकपणे सेवा करणारा कार्यकर्ता ते नेता असा प्रवास राजाभाईचा आहे यामुळेच खारेपाटातील लोकांचे प्रेम त्याच्यावर असल्याचे सांगत राजाभाई केणी,रसिकाताई केणी यांनी केलेल्या शिवजयंती उत्सव कार्यक्रमाच्या आयोजनाचे कौतुक करत आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी उपस्थित शिवभक्तांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

**२६ वर्ष संस्थेकडून जनसेवेचे कार्य _**
एखादी संस्था काढणे सोपे असते पण ती संस्था टिकून ठेवणे मोठे जिकिरीचे असते.गेले २६ वर्ष शिवनेरी ग्रुप सेवाभावी संस्थेकडून जनसेवा करण्यात येत आहे तसेच सर्व जनतेच्या सहकार्यातून शिवजयंती उत्सव आणि विविध समाजोपयोगी कार्यक्रम करण्यात येत आहेत आज शिवशंभू शौर्यगाथा या महानाट्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी सांगितले.

# सिडकोचा कारभार कुंभकर्णा सारखा!

## नैना प्रकल्पाबाबत ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या भावना विधानमंडळात लक्षवेधी स्वरूपात मांडताना आ. विक्रांत पाटील आक्रमक!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
नैना प्रकल्पाबाबत विधान परिषदेमध्ये लक्षवेधी मांडताना आमदार विक्रांत पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे मुंबई येथे सुरु असलेल्या अर्थ संकल्पीय अधिवेशनामध्ये पाहायला मिळाले. पनवेल उरण तालुक्यातील नैना प्रभावित क्षेत्रातील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या बाबतीतील असलेल्या समस्या,योजनेतील त्रुटी,सिडको अधिकारी यांची उदासीन मानसिकता,ग्रामस्थांशी असलेला संवादाचा अभाव या विषयात मुंबई येथे सुरु असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडून सरकारचे लक्ष आमदार विक्रांत पाटील यांनी वेधून घेतले.या वेळी आक्रमक झालेल्या आमदार विक्रांत पाटील यांनी सिडको प्रशासनाच्या कारभाराला कुंभकर्णाच्या झोपेची उपमा देत कुंभकर्णाची झोप तरी सहा महिन्यानंतर पुरी होत होती पण विकास आराखड्याला मंजुरी मिळून 12 वर्ष पूर्ण होऊन सुद्धा सिडको प्रशासन ठोस कामगिरी करण्यात अपयशी ठरले



असल्याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. आंतरराष्ट्रीय विमानतळाला साजेस शहर तयार करता यावं या करता विमानतळा पासून 20 किलोमीटर रेडियस मधला विकास नियोजन बद्ध पद्धतीने व्हावा या साठी नैना ( नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र) प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली.त्या नंतर स्पेशल प्लॅनींग अथॉरिटी म्हणून सिडकोकडे 2013 रोजी या प्रकल्पाची जवाबदारी सोपवण्यात आली.जवाबदारी देण्यात आल्यानंतर 2014 पहिला डीपी तयार करण्यात आला व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी देखील विक्रमी वेळेत डी पी ला मंजुरी दिली. याला आता 12 वर्षाचा चा कालावधी उलटून गेला आहे.मात्र या कालावधीत उदासीन मानसिकता तसेच अर्थकारण असेल याच ठिकाणी रस घ्यायचा या सिडको च्या धोरणामुळे सिडको ने कोणत्याही प्रकारची ठोस कामगिरी न केल्याने नैना प्रकल्पात समाविष्ठ गावांची संख्या 270 वरून 94 वर आल्याची माहिती देत सिडकोच्या या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी पडीक राहून शेतकरी देशोधडीला लागल्याचा आरोप आमदार विक्रांत पाटील यांनी केला आहे.

लक्षवेधी दरम्यान बोलताना आमदार पाटील यांनी लोकनेते दी बा पाटील यांच्या नावाचा उल्लेख करुण निर्मानाधीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दी बा पाटील यांचे नाव देण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितलं. मूळ गावठाण लगत असलेल्या शेतक-यांच्या बांधकामावरती अन्य व्यक्तींचे 40% अंतिम भूखंड अरेखित करण्यात आले आहेत, याचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून नकाशात आवश्यक फेरबदल करावे. मूळ गावठाण लगत अस्तित्वात असलेल्या 2000 पेक्षा जास्त बांधकामांवर सिडकोने ॲमेनिटीस्, ओपन स्पेसेस अशी आरक्षणे टाकून त्यांना बाधीत केले आहे. हे आरक्षण इतरत्र हलवून नकाशात आवश्यक ते फेरबदल करावे. योजनेत समाविष्ठ नसलेल्या गावठाण लगतच्या बांधकामाच्या नियमीतीकरणाकरीता संपूर्ण राज्यात लागू झालेल्या णऊउझठ मधील कंजेस्टेड एरिया साठीच्या तरतूदी लागू कराव्या लागतील, त्या तत्काळ कराव्या. रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या घरांच्या दिल्या गेलेल्या नोटीस बद्दल उत्तरात उल्लेख केलेला आहे ही बांधकामे सोडून इतर सर्व बाधित बांधकामे संरक्षित असावी, याबाबत कार्यवाही करावी. रस्त्यात बाधित होणाऱ्या घरांचे पुर्नवसन व मोबदला याबाबत सिडकोचे धोरण काय? नैना येण्यापूर्वीच्या बांधकामांच्या पुर्नविकासाबद्दल केवळ वाढीव 0.3 ऋडख देण्याबद्दल नैनाची भूमीका आहे. त्यामुळे पूर्वीच्या ठझ मधील चरुळीी 1 ऋडख व वाढीव 0.3 असा चरुळीी 1.3 चा ऋडख मिळू शकेल व यामध्ये कोणत्याच प्रकल्पाचा पुर्नविकास व्यवहार्य होऊ शकणार नाही. याबाबत णऊउझठ मधील महापालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या ढरलश्रश छे 6- मधील तरतूदी लागू कराव्या. जमीनीची प्रत्यक्ष कागदोपत्री मालकी नसतानाही, ही जागा अजूनही शेतकऱ्यांच्या ताबा कब्जात असतानाही सुमारे 7,900 कोटींच्या निविदा काढून सुमारे 300 कोटी रू ॲडव्हान्स कंत्राटदारांना दिला आहे. या गंभीर विषयात चौकशी करून कार्यवाही करावी. सर्व बाधीत बांधकामांना सिडकोने संरक्षित केले आहे तर मग या सर्व नैना क्षेत्रात बंद असलेले खरेदी, विक्री च्या रेजिस्ट्रेशन व्यवहारांना सुरू करण्याबाबत निर्णय घ्यावा. या सर्वच विषयात नगर विकास राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी सकारात्मक कार्यवाही विषयी आश्वस्त केले. सिडकोने ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधून सदर विषयातील संदिग्धता दूर करावी व शेतकऱ्यांना व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच पुढील कामकाज करणे विषयी सकारात्मक चर्चा झाली.

## राज्यस्तरीय स्पर्धेत स्वराज दळवी जिल्ह्यात सर्वप्रथम

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**
रोहा तालुक्यातील सुकेळी येथील माऊंट लिटिरा झी स्कूलमध्ये सहावी इयत्तेत शिकत असलेल्या स्वराज महेश दळवी हा राज्यस्तरीय स्पर्ध्येत रायगड जिल्ह्यात सर्वप्रथम आला आहे. इंग्रजी माध्यमातून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्ध्येत सुधागड तालुक्यातून परीक्षेत बसलेला स्वराज दळवी हा रायगड जिल्ह्यात सर्व प्रथम आला आहे. ही स्पर्धा अत्यंत आव्हानात्मक समजली जाते, तसेच एमपीएससी, युपीएससीसारख्या परीक्षांची पायाभरणी म्हणून याकडे पाहिले जाते. 05 जानेवारी रोजी ध्येय एज्युकेशन फाऊंडेशन महाराष्ट्र संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल 09 मार्च रोजी जाहीर झाला. स्वराज याने आतापर्यंत अॅबॅकससह विविध स्पर्धांतून घवघवीत यश संपादन केले असून, तो सुकेळी (नागोठणे) स्थित माऊंट लिटिरा झी स्कूलमध्ये सहावी इयत्तेत शिकत आहे. या यशाबद्दल त्याचे अनेकांनी कौतुक केले आहे.



# दापोलीत ठाकरेंना दे धक्का

## ■ आमदार, माजी नगरसेवकांचा शिंदेसेनेत प्रवेश

**मुंबई :** भांडुप, चेंबूर, गोरेगावसह दापोलीतील आमदार माजी नगरसेवकांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे भांडुप, चेंबूर, गोरेगावसह दापोलीतील उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला धक्का दिला आहे.

मागील अडीच वर्षात विकास कामांसाठी आमदारांना तीन हजार कोटींचा निधी दिला, मात्र सरकारवर खोक्यांचा आरोप करणाऱ्यांना मतदारांनी विधानसभा निवडणुकीत खोक्यात बंद केले, अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. पन्नास खोके नव्हे तर तीन हजार खोके विकास कामांसाठी दिले, असे शिंदे म्हणाले.

ठाकरे गटाचे दापोलीचे माजी आमदार संजय कदम, छत्रपती संभाजी नगरचे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर यांच्यासह मुंबईतील तीन माजी नगरसेवक पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. या पक्ष प्रवेशाने कोकणात आणि छत्रपती संभाजी नगरात उबाठा गटाला खिंडार पडले. दरम्यान, माजी आमदार संजय कदम यांना शिंदे सेनेच्या उपनेते पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

दापोली मतदार संघाचे माजी आमदार संजय कदम हे बाळासाहेबांच्या आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या शिवसेनेत स्वगृही परतले. कोकणात शिवसेना वाढत आहे. कोकणात एक जागा वगळता सर्वच जागांवर महायुतीचे आमदार जिंकले आहे. कोकणी जनतेने बाळासाहेबांवर आणि शिवसेनेवर नेहमीच प्रेम केले. मंत्री उदय सामंत, मंत्री योगेश कदम कोकणात काम करत आहेत. शिवसेना नेते रामदास कदम यांनी मागील पंचवीस वर्ष कोकणात काम केले. आता संपूर्ण कोकण शिवसेनामय झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. कोकणातील भूमीपूत्रांना तिथेच रोजगारांच्या संधी उपलब्ध केल्या जातील, असे ते म्हणाले. शिवसेनेचे दोन कदम एकत्र आल्याने आता दापोलीत फक्त शिवसेनेचा दम राहणार असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.



### या माजी नगरसेवकांचा सेनाप्रवेश

मुंबईतील भांडुपचे माजी नगरसेवक उमेश पाटील, चेंबूरच्या माजी नगरसेविका अंजली नाईक आणि गोरेगाव येथील माजी नगरसेविका लोचना चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी, शाखाप्रमुख, उप शाखप्रमुख, महिला सेना आणि शिवसैनिकांनी शिवसेनेत प्रवेश केला.

### छत्रपती संभाजीनगरमध्ये ठाकरेंना झटका

छत्रपती संभाजी नगर मधील वैजापूर, गंगापूर मतदार संघात आमदार रमेश बोरनारे यांच्या पुढाकाराने माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर, माजी नगराध्यक्ष साबीर खान, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिनकर बापू पवार, मा. जिल्हा परिषद सदस्य बादशाह पटेल, माजी पंचायच समिती सभापती-राजू मगर, डॉ.राजू डोंगरे, राम हरी जाधवे, बाबासाहेब जगताप यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

# तीन भाषा धोरणाचे चंद्राबाबूंकडून समर्थन

**हैदराबाद :** राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत तीन भाषा धोरणावरून वाद पेटला आहे. आता तीन भाषा धोरणाच्या समर्थनार्थ आंध्रचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू उतरले आहेत.

विधानसभेत बोलताना ते म्हणाले की, भाषा हे ज्ञानाचे साधन नाही, तर संवादासाठी आवश्यक आहे. माझी मातृभाषा तेलगू आहे. राष्ट्रीय भाषा हिंदी, तर आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजी आहे. आपल्याला जीवन जगण्यासाठी जितक्या भाषा शिकता येतील तितक्या शिकाव्यात, पण आपल्या मातृभाषेला कोणीही विसरू नये. पण, हिंदी भाषा शिकल्यास दिल्ली व देशाच्या अन्य भागात संवाद साधण्यास मदत मिळते. त्यातून फायदा मिळतो, असे ते म्हणाले.

हिंदी भाषा शिकल्यास दिल्लीत अस्खलित संवाद साधता येऊ शकेल. राजकारणाखेरीज जास्तीत जास्त भाषा कशा शिकता येतील, हे सर्वांनी पाहिले पाहिजे. ते लोक आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगतात, ते जगात यशस्वी होतात, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, भाषा हे संवादाचे माध्यम आहे. भाषेतून तुम्हाला ज्ञान मिळणार नाही.

# घरी शौचालय उभारणीसाठी लाभार्थ्यांना मिळणार अनुदान

**मुंबई :** मुंबईला हागणदारीमुक्त करण्याच्या दृष्टीने मुंबई महापालिकेने अनुदानात वाढ केली आहे. घर तिथे शौचालय या संकल्पनेतून केंद्र शासनाच्या वतीने ४ हजार तसेच राज्य सरकारच्या वतीने १ हजार रुपये दिले जायचे. आता या अनुदानाव्यतिरिक्त मुंबई महानगापलिमेकडून ११ हजार अनुदान मिळणार आहे. त्यामुळे शौचालाय उभारणीसाठी लाभार्थ्याला एकूण १६ हजार रुपये अनुदान मिळणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

देशातील सर्व शहरामध्ये व ग्रामीण भागात स्वच्छता व शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ०२ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान १.० हे केंद्र शासनाद्वारे राबविण्यात आले आहे. हे अभियान महाराष्ट्र राज्यात १५ मे २०१५ पासून राबवले जात आहे. त्यानुसार हे अभियान मुंबई महानगरपालिकेद्वारे राबविण्यात आले आहे. स्वच्छ भारत अभियान १.० अंतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय घटकांतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबाना केंद्र शासनाकडून ४ हजार रुपये व राज्य शासनाकडून १ हजार रुपये इतके असे एकूण ५ हजार रुपये अनुदान घरगुती शौचालयासाठी थेट लाभार्थींच्या खात्यात देण्यात येत होते. स्वच्छ भारत अभियान १.० राबवताना महानगरपलिकेचे २ हजार रुपये अनुदान मिळत होते.

शाश्वत स्वच्छता अंतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय या घटकानुसार नविन स्वतंत्र कुटुंबे, स्थलांतरीत कुटुंबे, सामुदायिक शौचालयांचा वापर करणारी कुटुंबे व अस्वच्छ शौचालये असणारी लाभार्थी अधिकृत तथा अनधिकृत वसाहतीमध्ये राहत असतील, तसेच अधिकृत आणि अनधिकृत असलेल्या झोपडपट्टीमध्ये राहत असलेल्यांना ही सुविधा उपलब्ध करून द्यावयाची आहे. फक्त पूर्वीच्या स्वच्छ भारत अभियानानुसार लाभ घेतलेले लाभार्थी या अभियानात पात्र असणार नाहीत.

### ...म्हणून मिळत नव्हते अनुदान

अर्जदार जिथे राहत असेल त्यांच्या ५०० मीटर परिघामध्ये सामुदायिक शौचालय नसेल, तरच ती व्यक्ती या अनुदास पात्र होती. झोपडपट्टी वस्ती तथा चाळींमध्ये सामुहिक शौचालय उपलब्ध असल्याने या अनुदानाचा लाभ यातील जाचक अटींमुळे मिळत नव्हता.

### रक्कम थेट खात्यात जमा होणार

वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च हा ३० हजार रुपये एवढा विचारात घेवून मुंबईत केंद्र शासनाचा व राज्य शासनाचा अनुक्रमे, ४ हजार रुपये व १ हजार एवढा निधी निश्चित करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त मुंबई महापालिकेकडून अतिरिक्त ११ हजार रुपयांचा निधी हा अनुदान स्वरुपात मिळणार असून मुंबईत घरोघरी शौचालय उभारण्यासाठी तब्बल १६ हजार रुपयांचे अनुदान शासन आणि महापालिकेच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून प्राप्त अनुदान लाभार्थी कुटुंबांना नव्याने विकसित झालेल्या पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे थेट खात्यात जमा होणार आहे.

# एकाकी वृद्धाची नातेवाईकानेच केली फसवणूक

**मुंबई :** एकाकी राहणाऱ्या वृद्धाला मदत करण्याच्या बहाण्याने त्याच्या नकळत त्याच्याच मोबाईलवरून युपीआय अँपद्वारे चार लाख ६८ हजार रुपये आपल्या खात्यात बँक ट्रान्स्फर करणाऱ्या नातेवाईकाविरुद्ध कुरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

गौरीप्रसाद उपाध्याय हे ६३ वर्षांचे वृद्ध कुरार गावात राहतात. त्यांची तीन मुले त्यांच्या कुटुंबियांसोबत परदेशात वास्तव्यास आहेत. उपाध्याय यांचे गॅस वेल्डिंगचे दुकान आहे. त्यांची विचारपूस करण्यासाठी त्यांचा चुलत पुतण्या किरण धुंगेल हा अधूनमधून त्यांच्या घरी येत असे. या काळात तो उपाध्याय यांना त्यांच्या मोबाईलमधील अँपमधून आर्थिक व्यवहार करण्यास मदत करीत असे.

गेल्या महिन्यात उपाध्याय हे त्यांच्या बँकेत गेले असता त्यांच्या खात्यात अवघे पाचशे रुपयेच शिल्लक असल्याचे समजले. साडेचार लाखाहून अधिक रक्कम असताना इतकीच रक्कम शिल्लक कशी याबाबत चौकशी केली असता उर्वरीत रक्कम युपीआय अँपद्वारा दुसऱ्या खात्यात ट्रान्स्फर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. आपला मोबाईल घेत किरण धुंगेल यानेच त्याच्या खात्यात २५ व्यवहारांमध्ये चार लाख ६८ हजार रुपये वळवल्याचे त्यांच्या लक्षात आले.

# महिला डॉक्टर विनयभंगप्रकरणी डॉक्टरला अटक

**वसई :** वसईतील प्रसिद्ध कार्डिनल ग्रेशस रुग्णालयातील महिला डॉक्टरचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी डॉक्टर अंजुम शेख यांना वसई पोलिसांनी अटक केली आहे. शेख यांना २ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या प्रकरणी रुग्णालयाच्या विशाखा समिती अंतर्गत चौकशी सुरू असल्याचे रुग्णालयाने सांगितले.

तक्रारदार पीडित डॉक्टर या २००९ पासून रुग्णालयात कार्यरत आहेत. त्यांनी रुग्णालयाचे वरिष्ठ सहकारी अंजुम अब्दुल सलाम शेख (५४) यांनी फेब्रुवारी २०२३ ते २०२५ या काळात रुग्णालयात लैंगिक छळ केल्याचा आरोप केला आहे. अश्लील शेरेबाजी करणे, सीसीटीव्ही बंद करून लगट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे. याबाबत १ फेब्रुवारी रोजी पीडित डॉक्टरने रुग्णालयाच्या व्यवस्थापनाकडे तक्रार दिली होती. त्यानंतर दोन वेळा विशाखा समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. मी रुग्णालयाच्या विशाखा समितीकडे तक्रार दिली. मात्र त्यानंतरही डॉक्टरने मला धमकावल्याने मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली, असे पीडित डॉक्टरने बोलताना सांगितले.

वसई पोलिसांनी डॉक्टर अंजुम अब्दुल सलाम शेख (५४) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. शेख याला अटक केली असून न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे, अशी माहिती वसई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक महेंद्र भामरे यांनी दिली.


### विशाखा समितीमध्ये सुनावणी सुरू

तक्रारदार महिला डॉक्टरने १ फेब्रुवारी रोजी डॉ. शेख यांच्या विरोधात लेखी पत्र दिले होते. पहिल्या पत्रात त्यांनी डॉ. शेख यांनी कार्यालयीन ठिकाणी २०२३ मध्ये अश्लील शेरेबाजी केल्याची तक्रार केली होती. त्यानुसार रुग्णालयाच्या अध्यक्षांनी तात्काळ बैठक आयोजित केली आणि त्यांचे सविस्तर म्हणणे ऐकून घेतले होते, असे रुग्णालयाच्या महाव्यवस्थापिका फ्लोरी डिमेंटे यांनी सांगितले. तक्रारदार डॉक्टरने यानंतर दिलेली दोन्ही पत्रे पुढील कारवाईसाठी विशाखा समितीकडे पाठविण्यात आले आहे. त्यांच्या तक्रारीवर विशाखा समितीमध्ये चौकशी सुरु आहे, असेही डिमेंटो यांनी सांगितले.

# मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी नांदेडमध्ये आयसीएआर ची ,शाखा स्थापना करा : खा. डॉ. अजित गोपछडे यांची राज्यसभेत मागणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड : महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्ह्यात भारतीय कृषी संशोधन परिषद ICAR ची शाखा स्थापन करून दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील कोरडवाहु शेती तंत्र विकसित करण्याची मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज राज्यसभेत केली. मराठवाडा हा महाराष्ट्रातील दुष्काळप्रवण भाग असून अनेक गंभीर कृषी समस्यांना गेली कित्येक वर्षे तोंड देत आहे. पाण्याची कमतरता, अनियमित पाऊस आणि हवामान बदल यांसारख्या नैसर्गिक समस्या येथे आहेत. या समस्यांमुळे पीक उत्पादनावर परिणाम होतो आणि शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा



सामना करावा लागतो. गावांमध्ये वारंवार दुष्काळी परिस्थिती निर्माण होते, ज्याचा त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होतो. पीक उत्पादनांत विविधतेचा अभाव असल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नही अस्थिर राहते. त्यामुळे दुष्काळाची स्थिती केवळ कृषी उत्पादनावरच परिणाम करत नाही, तर शेतकऱ्यांच्या जीवनमानालाही मोठे आव्हान देते. त्यामुळे मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त कृषी क्षेत्र दुष्काळमुक्त करण्यासाठी, भारतीय कृषी संशोधन परिषद ICAR ने दुष्काळ-प्रतिरोधक पिके, प्रभावी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि हवामान - प्रतिरोधक कोरडवाहु शेती तंत्रज्ञानावर संशोधनाला प्राधान्य द्यावे. या पार्श्वभूमीवर खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज राज्यसभेत भारत सरकारला विनंती केली की, ICAR च्या कोरडवाहु कृषि संस्थेची एक शाखा नांदेड येथे स्थापन करावी. यामुळे ICAR चे वैज्ञानिक अधिकारी स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून, मराठवाड्यातील प्रत्येक गावात शेतकऱ्यांसोबत संवाद साधून, दुष्काळ-प्रतिरोधक तथा कोरडवाहु कृषि तंत्रज्ञान संयुक्तिक विविध पिकांची माहिती देऊ शकतील, यामुळे दुष्काळ प्रवण भागाचा आर्थिक विकास शक्य होईल. आर्थिक संकटामुळे, मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा अत्यंत दुर्दैवी निर्णय घेतला आहे. म्हणूनच, भारत सरकारला माझी विनंती आहे की, ICAR च्या ड्राय लँड रिसर्च इन्स्टिट्यूटची शाखा नांदेड येथे स्थापन करून, स्थानिक शेतकऱ्यांना आवश्यक मदत व मार्गदर्शन दिले जावे. अशी मागणीही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज राज्यसभेत केली.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा आज 13 वा दिवस – न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच !

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

यवतमाळ, अखिल भारतीय बौद्ध भिक्खु संघाच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ यवतमाळच्या संविधान चौकात 5 मार्चपासून धरणे आंदोलन सुरू आहे. आज,18 मार्च रोजी या आंदोलनाचा 13 वा दिवस होता. यावेळी प्रा. पंढरी पाठे आणि सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई परचाके यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून या संघर्षाला जाहीर पाठिंबा दिला.

> "महाबोधी महाविहार मुक्ती ही केवळ मागणी नाही,तर हा आमच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. हा लढा न्यायासाठी असून,तो मागे हटण्याचा प्रश्नच नाही.आम्ही हा संघर्ष अखेरच्या टप्प्यापर्यंत नेऊ आणि न्याय मिळेपर्यंत लढत राहू."
>
> – **विद्या परचाके**

त्यांनी न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा



निर्धार व्यक्त केला.या आंदोलनात मोठ्या संख्येने बौद्ध अनुयायी सहभागी होत आहेत. आजच्या आंदोलनात संगीता सूर्यवंशी,आरुषा वाळके,गायत्री खोब्रागडे, सुरेखा तेलतोमडे,विना नागदिवे,संगीता मेश्राम,वैशाली मेश्राम,लीना बोरकर, युवराज मेश्राम,सुभाष डोंगरे,धर्मराज गणवीर,सुमेध ठमके,अभिजीत बनसोड, संघमित्रा रामटेके आदी उपस्थित होते.

> "महाबोधी महाविहार मुक्ती हा केवळ बौद्ध समाजाचा लढा नाही,तर हा अन्यायाविरुद्धचा संघर्ष आहे.आम्ही न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही.हा लढा अहिंसात्मक मार्गाने सुरूच राहील आणि मागण्या पूर्ण झाल्याशिवाय थांबणार नाही."
>
> – **प्रा.पंढरी पाठे**

**अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका – मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरूच !**

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे की महाबोधी महाविहार मुक्तीच्या मागण्या मान्य होईपर्यंत हा संघर्ष सुरूच राहणार आहे.आगामी दिवसांत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# कुरआन मधील जीवन

पवित्र रमजान महिन्यांमध्ये कुरआनशरीफचे पृथ्वीतलावर अवतरण झालेले असल्याने या महिन्यात जगभरामध्ये सर्वाधिक कुरआन पठण केले जाते.याला तिलावते कुरआन म्हणतात.तसं कुरआन शरीफ हा ग्रंथ दररोज वाचण्यासारखा आहे. मूळ अरबी भाषेत असलेल्या या ग्रंथाचं नुसतं वाचन न करता त्यातील अर्थ समजून घेऊन त्याप्रमाणे आपल्या जीवनामध्ये आचरण करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे. दैनंदिन जीवनामध्ये घडणाऱ्या अनेक घटना अनाकलनीय असतात. अचानकपणे काही प्रसंग निर्माण होतात. अशा प्रसंगी नेमका कोणता निर्णय घ्यावा हे आपल्याला सुचत नाही. त्यासाठी मार्गदर्शक म्हणून कुरआन शरीफ मधील अल्लाह तआलाचे आदेश आणि उपदेश आपल्याला मार्गदर्शक ठरत असतात.दररोजच्या जीवनामध्ये येणाऱ्या समस्यांपैकी अनेक प्रश्नांची उकल कुरआन शरीफ मध्ये नमूद केलेली आहे. त्याचबरोबर हजरत पैगंबर आणि त्यांच्या नंतरच्या सगळ्याच धार्मिक जाणकारांनी माणसाने कसे वागावे ?याबाबत काही अनमोल उपदेश केलेले आहेत. जसे - जर सदैव आनंदित रहावयाचे असेल तर वेळेवर नमाज अदा करावी.चेहरा तजेलदार राहावा असे वाटत असेल तर तहज्जुद( मध्यरात्रीनंतर आदा केली जाणारी नमाज )अदा करावी. जर मनाला शांतता हवी असेल तर कुरआनशरीफ ची तिलावत करावी. आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर रोजे धरावेत. समस्यांची उकल करायची असेल तर अस्तगफार करावा. (असतगफार म्हणजे अल्लाह तआलाची मागितलेली माफी).जर




बरकत पाहिजे असेल तर दरुद शरीफ पठण करावे.(दरूद शरीफ म्हणजे हजरत मोहम्मद पैगंबर सल्लल्लाहो अलैहे व सल्लम यांच्या नावाने केला जाणारा जप) समस्या आणि चिंता मुक्त व्हावयाचे असेल तर लाहौल वला कुव्वता इल्ला बिल्ला या श्लोकाचे पठण करावे. दुःखांपासून चिंतामुक्त होण्यासाठी दुआ मागावी.नेहमी अल्लाहचे नामस्मरण करावे.प्रेषित हजरत पैगंबरांनी दाखवून दिलेल्या मार्गावर सदैव मार्गक्रमण करावे. आपल्यामुळे कोणाला ही कशाही प्रकारचे दुःख पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी.नेहमी खरेच बोलावे. खोटे बोलून आपले पुण्य वाया घालवू नये. गरजू महिला-पुरुष,मुले,मुली यांची नेहमी मदत करावी.विधवा आणि अनाथ यांना नेहमी मदत करावी. आपण करीत असलेले प्रत्येक कृत्य हे अल्लाहला ज्ञात आहे. मग ते उजेडात करा किंवा अंधारात करा. त्यामुळे सतत अल्लाहची भीती मनात ठेवून जीवन जगावे. कारण या दुनियेत आपण करणार असलेल्या प्रत्येक कार्याचा हिशोब कयामतच्या दिवशी होणार असून आपण केलेल्या कार्याप्रमाणे जमाखर्च होऊन आपल्या जीवनाचं निकाल पत्रक (नाम ए आमाल) प्रत्येकाला प्राप्त होणार आहे. त्यामुळे मी हे केलं पण कुणाला माहीत नाही, मी ते केलं पण कोणी ही पाहिले नाही. या भ्रमात कोणीही राहू नये.नफरत आणि द्वेष पसरवून कुणाचेही भले झालेले नाही हा या जगाचा इतिहास आहे.याची जाणीव ठेवून प्रत्येकाने वागावे.तरच जीवनात शांतता नांदते.(क्रमशः)

**सलीमखान पठाण**
**9226408082.**

# नवघर येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे पारायण मोठ्या भक्तीभावात संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

उरण तालुक्यातील नवघर गावात श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय मंडळ नवघर व उरण पंचक्रोशीतील वारकरी सांप्रदाय मंडळ यांच्या सहकार्याने व गुरूवर्य काव्यतिर्थ,आचार्य वेदांत वाचस्पती श्री सद्गगुरू वै.ह.भ.प.जगन्नाथ महाराज पवार (औरंगाबाद) व आप्पा माऊली यांच्या कृपाशिर्वादाने व ह.प.भ.वै.अनंत महाराज पारगावकर व कै.गिरधर हरी तांडेल व कै.बाबीबाई गिरधर तांडेल यांना विनम्र अभिवादन करून दिड दिवसाचा हरिनाम सोहळा व ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण (९,१२,व १८) साजरा करण्यात आला.

अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे पारायण फाल्गुन कृ.३ सोमवार दि.१७/०३/२०२५ ते फाल्गुन कृ.४ मंगळवार दि.१८/०३/२०२५ रोजी मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला असून सोमवार दि.१७/०३/२०२५ रोजी सकाळी ४-०० वाजता काकडा माऊली हरिपाठ मंडळ नवघर पाडा ह.भ.प.लक्ष्मण महाराज बंडा,ह.भ.प.गजानन महाराज ठाकुर बेलपाडा ,ह.भ.प.कमळूबाई,ह.भ.प.मनोहर बुवा, ह.भ.प.राकेश सोनकर,ह.भ.प.कमळाकर म्हात्रे शेवे, ह.भ.प.गिता बंडा,ययाती बंडा,जमुना बंडा,वंदना बंडा,रजनी बंडा,संगिता बंडा,चंद्रकांत बंडा,शारदा बंडा,प्रभावती बंडा,शिला बंडा,उर्मिला बंडा,भिमाबाई दमवंती बंडा,जया बंडा,नंदा बंडा,मालती बंडा,जयश्री बंडा तर ग्रामदेवतेचे अभिषेक व महापुजा विश्वास बळीराम तांडेल व विजय पुरूषोत्तम तांडेल यांच्या शुभहस्ते करून ज्ञानेश्वरी वाचन सोमवार दि.१७/०३/२०२५ रोजी सकाळी ८-०० ते ११-०० वाजता व्यासपीठ चालक ह.भ.प.गोपीनाथ म.ठाकुर जासई व ह.भ.प.बाळकृष्ण महाराज भगत गव्हान यांच्या मार्गदर्शनात झाले. नंतर सायंकाळी ३-०० ते ४-०० वाजता दिंडी मिरवणूक होऊन सायंकाळी ४-३० ते ५ -३० वाजता जयशिव शंकर प्रासादीक भजन मंडळ (आवरे) बुवा अनंता भगत(आवरे) व बुवा तज्ञेश भगत (भेंडखळ) यांचा भजनाचा कार्यक्रम झाल्या नंतर ५-३० ते ६-३० वाजता हरिस्मरण वारकरी सांप्रदाय मंडळ वशेणी चालक ह.भ.प.अनिल महाराज गावंड,श्रीकृष्ण हरिपाठ मंडळ बेलपाडा,चालक ह.भ.प.गजानन महाराज तसेच श्री जगतगुरू संत तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्था वारदोली,माऊली हरिपाठ मंडळ नवघरपाडा चालक ह.भ.प.लक्ष्मण महाराज बंडा नंतर ६-३० ते ७-३० दिपोत्सव होऊन रात्री ८-०० ते १०-०० वाजता रामायणाचार्य ह.भ.प.श्री संजय महाराज वारदोली यांचे किर्तन होऊन दुस-या दिवशी मंगळवार दि.१८/०३/२०२५



रोजी सकाळी ८-०० ते १- ०० वाजता श्री विश्व धर्म वारकरी शिक्षण संस्था वारदोली यांचे भजन व शिवचरित्र व्याख्यान ह.भ.प.श्री अमित महाराज (बळवली पेण) यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होऊन सर्व वारकरी भाविकांनी महाप्रसादाचा आंनद घेतला.सदर हरीनाम सप्ताहाचे संस्थापक रायगड भुषण ह.भ.प.प्रभाकर महाराज तसेच व्यवस्थापक श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय नवघर व ग्रामस्थ मंडळ नवघर यांचे विशेष सहकार्य लाभल असून यावेळी नवघर गावासह परिसर हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघाले होते.